अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- ३१/१०/२०२५

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ३४/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | अभिजित सुदाम दीक्षित, ४३ वर्षे, पद- दुय्यम अभियंता, के/ पुर्व वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी(प), मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये ७,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रुपये ३,५०,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये ३,५०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी हया खाजगी कंपनीत लायसनिंग ऑफिसर म्हणून काम करतात. फिर्यादी हया काम करीत असलेल्या कंपनीने एका आस्थापनेस फॅक्टरी लायसन्स मिळण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानुसार सदरहू कामासंदर्भात फिर्यादी यांनी के/पुर्व वार्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी, मुंबई या कार्यालयात जावून लोकसेवक अभिजित दीक्षित यांची भेट घेतली असता, लोकसेवक यांनी सदरहू कामाकरीता फिर्यादी यांचेकडे रू. ७,००,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी ५०% रक्कम रू. ३,५०,०००/- लाच घेवून येण्यास सांगितले. परंतु फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक १५/१०/२०२५ रोजी तक्रार अर्ज केला.<br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १६/१०/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, यातील लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्या प्रलंबीत कामाकरीता फिर्यादी यांचेकडे रू. ७,००,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी ५०% रक्कम रू. ३,५०,०००/- लाच स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक ३०/१०/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक अभिजित दीक्षित यांना फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू. ३,५०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती उमा गवळी, सहाय्यक पोलीस आयुक्त** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. गणपत परचाके, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(मनिषा झेंडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**